महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ २३ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २०८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये


## संपादकीय

### महापालिकांत महिला नेतृत्वाचा नवा अध्याय

महापालिकांमधील महिला आरक्षणामुळे उभे राहिलेले महिला नेतृत्व हे केवळ सत्तेचे गणित बदलणारे नाही, तर प्रशासनाची दिशा बदलणारे ठरत आहे. आजपर्यंत पुरुषप्रधान मानल्या गेलेल्या स्थानिक राजकारणात महिलांनी स्वतःचे स्थान निर्माण केले असून, त्या आता निर्णयप्रक्रियेच्या केंद्रस्थानी येत आहेत. ही बाब लोकशाही अधिक परिपक्व होत असल्याचे द्योतक आहे. महिलांचे नेतृत्व हे अनेकदा संवादकेंद्रित आणि संघर्ष टाळणारे असल्याचे दिसून आले आहे. नागरिकांच्या तक्रारी, झोपडपट्टी पुनर्वसन, महिला सुरक्षितता, सार्वजनिक आरोग्य, बालकांचे शिक्षण अशा विषयांवर महिला लोकप्रतिनिधी अधिक संवेदनशीलतेने भूमिका घेतात. त्यामुळे प्रशासन आणि सामान्य नागरिकांमधील दरी कमी होण्यास मदत होते.

महिला महापौर झाल्याने तरुणी आणि गृहिणींमध्ये राजकीय सहभागाची प्रेरणा निर्माण होते. "राजकारण आपल्यासाठी नाही" ही मानसिकता बदलून महिलाही सक्षम प्रशासक होऊ शकतात, हा आत्मविश्वास समाजात रुजतो. याचा थेट परिणाम पुढील काळात अधिक महिला नेतृत्व पुढे येण्यात दिसून येईल.

याशिवाय, महिला सत्तेत आल्याने भ्रष्टाचार, दडपशाही आणि अहंकारयुक्त कारभाराला मर्यादा येतात, असा अनुभव अनेक ठिकाणी दिसून आला आहे. महिला नेतृत्वामुळे प्रशासन अधिक जबाबदार, नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध होण्याची शक्यता वाढते. मात्र, महिला महापौर असणे म्हणजे केवळ चेहरा बदलणे नव्हे, तर स्वतंत्र निर्णयक्षमता, पक्षीय दबावापलीकडे जाऊन भूमिका घेणे आणि विकासाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. जर महिलांना केवळ "पडद्यामागील नेतृत्वाची प्रतिनिधी" बनवले गेले, तर आरक्षणाचा मूळ उद्देशच अपूर्ण राहील. एकूणच, महापालिकांमधील महिला राज ही काळाची गरज आहे. या संधीचे रूपांतर जर सक्षम प्रशासन, जनहिताचे निर्णय आणि सामाजिक समतेच्या दिशेने पावले टाकण्यात झाले, तर भविष्यातील स्थानिक राजकारण अधिक सकारात्मक, समतोल आणि विकासाभिमुख होईल—हीच या महिला नेतृत्वाकडून अपेक्षा आहे.

# महानगरपालिकांत महिलाराज !

## राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी १५ महापालिकांचे महापौरपद महिलांसाठी राखीव

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता ■ प्रतिनिधी / दि. २२**

राज्यातल्या २९ महानगर पालिकांमधल्या महापौर पदाची आरक्षणाची सोडत आज मंत्रालयात काढण्यात आली. पुढच्या अडीच वर्षांसाठी ही सोडत निघाली असून, २९ पैकी १५ महापालिकांचं महापौरपद विविध प्रवर्गातल्या महिलांसाठी राखीव झालं आहे. राज्यातल्या १७ महानगरपालिकांमधे महापौरपद अनारक्षित राहील. या १७ पैकी मुंबई, नवी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, मीरा भाईंदर, मालेगाव, नांदेड-वाघाळा आणि धुळे या ९ ठिकाणी महापौरपद खुल्या प्रवर्गातल्या महिला उमेदवारांसाठी असेल. तर छत्रपती संभाजीनगर, पिंपरी चिंचवड, सांगली-मिरज-कुपवाड, परभणी, अमरावती, सोलापूर, वसई-विरार आणि भिवंडी निजामपूर खुल्या प्रवर्गासाठी आहे.

पनवेल, इचलकरंजी, कोल्हापूर आणि उल्हासनगर महानगरपालिकातलं महापौर पद नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी तर जळगाव, चंद्रपूर, अहिल्यानगर आणि अकोल्यातलं महापौर पद नागरिकांच्या मागास प्रवर्गातल्या महिला उमेदवारासाठी राखीव झालं आहे. ठाण्याची जागा अनुसूचित जातींसाठी राखीव असून जालना आणि लातूरमध्ये अनुसूचित जातीतल्या महिला नगरसेविकेला महापौर पदाची संधी मिळेल. कल्याण-डोंबिवली महापालिकेतलं महापौर पद अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झालं आहे.

विरोधकांनी आरक्षणाच्या या प्रक्रीयेवर टीका केली आहे. ही प्रक्रीया अपारदर्शकपणे राबविल्याचा दावा काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. आरक्षण सोडत काढण्याचे नियम कुणालाही न सांगता बदलण्यात आले होते. सोडतीपूर्वीच आरक्षण निश्चित केलेलं होतं, असा आरोप मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी केला.

मुंबईतले गेले २ महापौर सर्वसाधारण प्रवर्गातून होते त्यामुळं यंदा ओबीसी किंवा अनुसूचित जमाती प्रवर्गातल्या सदस्याला संधी मिळायला हवी होती, असं त्या म्हणाल्या. सरकारनं हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. नियमानुसार सर्व प्रक्रीया पार पाडल्याचं स्पष्टीकरण नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिलं आहे. मुंबई आणि नवी मुंबईत महिला राज असणार आहे. तर ठाणे आणि कल्याण-डोंबिवलीमध्ये खुला प्रवर्गाला संधी मिळेल. पुणे आणि सोलापूरमध्ये महिला महापौर असतील, तर पिंपरी-चिंचवड आणि सांगलीत खुला प्रवर्ग असेल. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, जळगाव आणि मालेगाव अशा चारही प्रमुख शहरांत महिलांचे वर्चस्व राहणार आहे. तसेच नागपूर, अकोला आणि चंद्रपूरमध्ये महिला महापौर असतील, तर छत्रपती संभाजीनगरमध्ये खुला प्रवर्ग निश्चित झाला आहे.

दरम्यान निवडणुकीचे निकाल जाहीर होऊन चित्र स्पष्ट झालेले असतानाच आता महापौरपदाचे आरक्षण जाहीर झाल्याने अनेक महापालिकांमधील राजकीय गणिते पूर्णपणे उलटपालट झाली आहेत. अनेक वर्षांपासून महापौरपदाचे स्वप्न पाहणाऱ्या आणि निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने विजयी झालेल्या दिग्गज पुरुष नेत्यांची या आरक्षणाने मोठी कोंडी केली आहे. विशेषतः मुंबई, पुणे आणि नागपूर यांसारख्या शहरांत सत्ता समीकरणे जुळवताना आता खमक्या महिला नेतृत्वाची शोधमोहीम पक्षपातळीवर वेगाने सुरू झाली आहे.

# कल्याण डोंबिवलीत आरक्षणामुळे भाजप महापौरपदाच्या शर्यतीतून बाहेर ?

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता ■ प्रतिनिधी / दि. २२**

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महापौरपदाची सोडत अनुसूचित जमातीसाठी राखीव जाहीर झाल्याने राजकीय चित्र स्पष्ट झाले असून, या आरक्षणामुळे भाजप महापौरपदाच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गातील दोन निवडून आलेले नगरसेवक शिवसेनेकडे असल्याने शिवसेनेचे पारडे जड झाले असून, महापौरपदावर शिवसेनेची सरशी निश्चित मानली जात आहे.**

कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत ३१ पॅनलमधून एकूण १२२ नगरसेवक निवडून आले आहेत. महापौरपदासाठी इच्छुकांची मोठी गर्दी असतानाच आरक्षण सोडत जाहीर झाली. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या या पदासाठी भाजपचा एकही नगरसेवक निवडून न आल्याने त्यांचा दावा संपुष्टात आला आहे. या प्रवर्गात शिवसेनेच्या नगरसेविका हर्षाली थवील–चौधरी, नगरसेवक किरण भांगले आणि मनसेच्या नगरसेविका शीतल मंढारी हे तीनच उमेदवार असल्याने यापैकी एकाची महापौरपदी निवड निश्चित आहे. शिवसेनेकडे दोन उमेदवार असल्याने पक्षांतर्गत चुरस वाढली पान ३ वर ▶▶▶



# 'मातृशक्तीच्या नेतृत्वात मुंबई सुरक्षित आणि भ्रष्टाचारमुक्त होणार' - अमित साटम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

**मुंबई :** महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या असून, या निवडणुकांमध्ये भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मात्र काही महानगरपालिकांमध्ये सत्ता स्थापन करताना भाजपाला सहयोगी पक्षांचा किंवा प्रसंगी विरोधी गटातील काही नगरसेवकांचा पाठिंबा घ्यावा लागला. तर राज्यात सत्तेत एकत्र असलेले पक्ष स्थानिक पातळीवर परस्परविरोधी भूमिका घेताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर अनेक महानगरपालिकांमध्ये सत्तास्थापनेचे राजकीय नाट्य सुरू असतानाच महापौरपदाच्या आरक्षण सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

अखेर ही सोडत जाहीर झाल्यानंतर मुंबई महापौरपदाबाबत प्रतिक्रिया देताना भाजपाचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी स्पष्ट भूमिका मांडली. मुंबईचे नेतृत्व सक्षमपणे सांभाळू शकेल अशी माता-भगिनीच मुंबईची महापौर होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच सोडतीवरून गोंधळ घालणाऱ्या विरोधकांनाही त्यांनी प्रत्युत्तर दिले.

अमित साटम म्हणाले की, "मुंबईचा विकास सुरू असताना आणि शहराची सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी मुंबईचं नेतृत्व एका माता-भगिनीकडे जाणार आहे, याचा आम्हाला अभिमान आहे. मातृशक्तीच्या नेतृत्वात मुंबई महापालिका भ्रष्टाचारमुक्त होईल, मुंबई खड्डेमुक्त होईल आणि मुंबईची तुंबई होणार नाही."

ते पुढे म्हणाले, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मुंबईचा विकास होत असताना आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व्हिजननुसार काम करण्यासाठी मातृशक्ती सज्ज आहे. मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी हे नेतृत्व निर्णायक ठरेल," असा विश्वासही साटम यांनी व्यक्त केला.

महापौरपदाच्या सोडतीनंतर आता मुंबईसह राज्यातील इतर महानगरपालिकांमध्ये सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला असून, स्थानिक राजकारणातील घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# माघी गणेशोत्सवानिमित्त टिटवाळ्यात गणेशभक्तांचा महापूर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

**टिटवाळा : माघ शुद्ध चतुर्थी अर्थात श्री गणेश जन्मोत्सव गुरुवार, दि. २२ जानेवारी रोजी टिटवाळ्यात अत्यंत भक्तिभाव, उत्साह आणि मंगल वातावरणात साजरा झाला. पहाटेपासूनच टिटवाळा गणेश मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. *'गणपती बाप्पा मोरया'*च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.**

सकाळी ठीक बारा वाजून ४० मिनिटांनी अत्यंत पवित्र आणि मंगल क्षणी श्री गणरायाचा जन्मोत्सव सोहळा पार पडला. मंत्रोच्चार, शंखनाद, घंटानाद आणि हजारो भाविकांच्या जयघोषात श्री गणेश जन्माचा दिव्य क्षण साजरा करण्यात आला. या वेळी अनेक भाविकांच्या डोळ्यांत भक्तीभाव आणि आनंदाश्रू दाटून आले होते.



या पावन दिनानिमित्त पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात झाली. सकाळच्या विशेष नारदीय कीर्तनाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. त्यानंतर दिवसभर पूजाअर्चा, अभिषेक, मंत्रजप, आरती आणि विविध धार्मिक विधींमुळे वातावरण अधिकच पवित्र व मंगलमय झाले. दुपारी श्री गणेश जन्मोत्सवाचा मुख्य सोहळा अत्यंत शिस्तबद्ध नियोजनात आणि भक्तिभावात पार पडला. त्यानंतर झालेल्या महाआरतीसाठी भाविकांची अलोट गर्दी झाली होती. हजारो भाविकांनी एकाच वेळी गणरायाच्या चरणी नतमस्तक होत श्रद्धेचे पुष्प अर्पण केले. दुपारच्या सत्रात भजन-कीर्तनाचा भक्तिसंगीतमय कार्यक्रम झाला. संतवाणी, भक्तिगीते आणि हरिनामाच्या गजराने संपूर्ण परिसर आध्यात्मिक ऊर्जेने भारून गेला. संध्याकाळी ठीक ७ वाजता श्रींचा पालखी सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडला. आकर्षक फुलांची सजावट, विद्युत रोषणाई, पारंपरिक वाद्यांचा निनाद आणि भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे पालखी सोहळ्याला अलौकिक तेज प्राप्त झाले. माघ शुद्ध चतुर्थीचा हा उत्सव केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित न राहता भक्ती, श्रद्धा, परंपरा आणि संस्कृतीचे भव्य दर्शन घडवणारा ठरला. श्री गणरायाच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण टिटवाळा परिसर दिवसभर भक्तिरसाच्या मंगलमय वातावरणात न्हाऊन निघाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## महत्वाचे



### खडवली येथे हरिनाम सप्ताहानिमित्त श्रीराम कथा संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

**ठाणे :** कल्याण तालुक्यातील खडवली येथे अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त आयोजित करण्यात आलेली श्रीराम कथा अत्यंत भक्तिभावाच्या वातावरणात संपन्न झाली. खडवली विलास पिंताबरे, खडवली–फळेगाव रोड येथे शनिवार दि. १७/०१/२०२६ ते मंगळवार दि. २०/०१/२०२६ दरम्यान हा धार्मिक सोहळा पार पडला.

ह.भ.प. रामायणाचार्य विश्वनाथ महाराज वारिंगे (पाले–अंबरनाथ), अखिल भारतीय संत समिती महाराष्ट्र प्रदेश संघटन मंत्री यांच्या श्रीराम कथेचे आयोजन शनिवार दि. १७ जानेवारी ते सोमवार दि. १९ जानेवारी दरम्यान करण्यात आले. दररोज पहाटे ४ वाजता काकड आरती, सायंकाळी ५ ते ६ सामुदायिक हरिपाठ आणि सायंकाळी ६ ते ९ या वेळेत श्रीराम कथा पार पडली.

सोमवार दि. १९ जानेवारी रोजी दुपारी ३ ते सायं. ५.३० या वेळेत भव्य पालखी सोहळा पार पडला. मंगळवार दि. २० जानेवारी रोजी सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत ह.भ.प. वारकरी भूषण चैतन्य महाराज निंबोळे (पैठणकर) यांचे काल्याचे कीर्तन झाले. त्यानंतर आभार प्रदर्शन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

हा अखंड हरिनाम सोहळा अखिल भारतीय वारकरी मंडळ, कल्याण तालुका व खडवली परिसराच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. कल्याण, भिवंडी, शहापूर व मुरबाड तालुक्यातील वारकरी व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रवणसुखाचा लाभ घेतला.

या सोहळ्यास माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, सामाजिक कार्यकर्ते दिनेश कथोरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. भक्ती, श्रद्धा आणि परंपरेचा संगम ठरलेल्या या सोहळ्यामुळे संपूर्ण खडवली परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# बदलापूरच्या सुरक्षेला बळ !

## आ. किसन कथोरे यांच्या हस्ते सात अग्निशमन बंबांचे लोकार्पण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२ बदलापूर :**

बदलापूर शहराच्या वाढत्या लोकसंख्या, वेगवान नागरीकरण आणि आपत्कालीन सुरक्षेच्या गरजा लक्षात घेता कुळगांव–बदलापूर नगरपरिषदेला राज्य शासनाच्या माध्यमातून ७ नवीन अग्निशमन वाहने उपलब्ध झाली असून, या अत्याधुनिक वाहनांचा लोकार्पण सोहळा मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते आज मोठ्या उत्साहात पार पडला.



बदलापूर शहरात मागील काही वर्षांत झपाट्याने निवासी व व्यावसायिक संकुलांची उभारणी झाली आहे. त्याचबरोबर लोकसंख्येतही लक्षणीय वाढ झाली असून, आगीच्या घटना, औद्योगिक अपघात, नैसर्गिक आपत्ती आणि इतर आपत्कालीन प्रसंगांमध्ये तात्काळ मदतीची गरज सातत्याने जाणवत होती. याच पार्श्वभूमीवर अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करण्यासाठी राज्य शासनाच्या सहकार्याने ही नवीन अग्निशमन वाहने नगरपरिषदेला प्राप्त झाली आहेत.

या वाहनांमुळे आग लागण्याच्या घटनांमध्ये जलद प्रतिसाद देणे, नागरिकांचे प्राण व मालमत्ता सुरक्षित ठेवणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत प्रभावी मदत पोहोचवणे अधिक सुलभ होणार आहे. बदलापूर शहराच्या सुरक्षिततेसाठी हा एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे मत आमदार किसन कथोरे यांनी व्यक्त केले.

या लोकार्पण सोहळ्याला नगराध्यक्षा सौ. रुचिता घोरपडे, उपनगराध्यक्षा सौ. प्रियांका दामले, मुख्याधिकारी श्री. मारुती गायकवाड, भाजपा गटनेते श्री. शरद तेली, शिवसेना गटनेते श्री. श्रीधर पाटील, तसेच सर्व नगरसेवक, नगरपरिषदेचे पदाधिकारी, अधिकारी, अग्निशमन विभागाचे कर्मचारी, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार किसन कथोरे यांनी, "बदलापूर शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असून, भविष्यातही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सुरक्षेसाठी शासनाच्या माध्यमातून अधिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील," असे सांगितले.

दरम्यान, याच कार्यक्रमात कुळगांव–बदलापूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ. रुचिता राजेंद्र घोरपडे यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते त्यांना केक भरवून शुभेच्छा देण्यात आल्या. त्यांच्या सामाजिक, प्रशासकीय आणि लोकहिताच्या कार्याला पुढील काळात अधिक यश लाभो, अशी सदिच्छाही यावेळी व्यक्त करण्यात आली.




दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com
पान : ०२
ठाणे ■ शुक्रवार
२३ जानेवारी २०२६



## वाचक मनोगत

### सहर शेख चे भाषण गंभीरपणे घेणे गरजेचे आहे

नुकत्याच मुंब्रा येथून ओवेसींच्या MIM पक्षातर्फे नगरसेविका निवडून आलेल्या सहर शेख या मुस्लिम महिलेचा भाषणाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.त्यामध्ये त्यांनी पुढल्या 5 वर्षात मुंब्रा पूर्ण हिरवा करून येथील लोकांना हाकलून देण्याची भाषा केली आहे.तसेच मै किसी के बाप की मोहताज नही हुं,असे पण जाहीरपणे

सुनावले आहे.खरे म्हणजे या बाई शरद पवार यांच्या शाहू फुले आंबेडकर विचारसरणीच्या पुरोगामी राष्ट्रवादी पक्षाच्या,त्यात जितेंद्र आव्हाड यांच्या जवळच्या पण MIM मध्ये गेल्यानंतर त्यांनी सोयीस्कर रित्या,शाहू फुले आंबेडकर या विचाराला तिलांजली देत,संविधान,शरद पवार आणि जितेंद्र आव्हाड यांना सुद्धा खुले आव्हान दिलेआहे,असो,असेच विधान जर कोणी हिंदू नगरसेवकाने केले असते.. की मी फक्त रामाला मानतो कोणाच्या बापाला मानत नाही,हे शहर सगळे मी भगवे करून इथून सगळयांना हाकलून देईन,तर या विधानावर महाराष्ट्रातील,पुरोगामी वडाच्या तमाम पारंब्या,काही विद्वान पत्रकार..आत्तापर्यंत बोंबाबोंब करत विवस्त्र फिरले असते.

**- श्री.सुनील इंगळे सामाजिक कार्यकर्ता, कल्याण.**

## मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात विविध कार्यक्रमांतून नवी मुंबईत मराठीचा जागर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

देशात 3 हजाराहून अधिक बोलीभाषा असून बोलीभाषांना इथल्या मातीचा गंध असतो, त्यामुळे बोलीभाषांच्या पायावरच प्रमाण भाषेची इमारत उभी असते असे मत व्यक्त करीत लेखक श्री.गजआनन म्हात्रे यांनी आपल्या सहका-यांसह 'आंग्रु डुंग्रू' या कार्यक्रमातून विविध उदाहरणे देत, लघुकथा, कविता, धवलेगीत सादर करीत आगरी भाषेतील सौंदर्यस्थळांचे नितांतसुंदर दर्शन घडविले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 28 डिसेंबरपर्यंत वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून आगरी बोलीभाषेचे महत्व सांगणा-या 'आंग्रु डुंग्रू' या कार्यक्रमाला उपस्थितीतांची चांगली दाद मिळाली.

नवी मुंबईची ओळख ही आगरी-कोळ्यांची भूमी आहे. त्यामुळे इथली मूळ बोलीभाषा असणा-या आगरी भाषेतील गोडवा व तिचा



इतिहास आणि परंपरेची ओळख व्हावी याद्दष्टीने 'आंग्रु डुंग्रू' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आगरी भाषेत विपुल लेखन करणारे साहित्यिक श्री.गजआनन म्हात्रे यांच्यासह गायिका श्रीम.संगीता पाटील व कवी श्री. अजय भोईर यांनी कविता, गीत, लघुकथा सादरीकरणातून आगरी साहित्याची नजाकत पेश केली.

अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त नामवंत ग़ज़लकार डॉ.कैलास गायकवाड यांनी प्रत्येक भाषेची स्वत:ची अशी सौंदर्यस्थळे असतात असे सांगत आगरी बोलीभाषेचे महत्व विशद केले. याप्रसंगी मुख्य विधी अधिकारी श्री.अभय जाधव, कार्यकारी अभियंता श्री.प्रवीण गाडे व श्री. तानाजी शिंदे, सहा.आयुक्त श्री.अरूण पाटील आणि अधिकारी, कर्मचारी व नागरिकांची रसिक उपस्थिती होती. पंधरवड्यातील पुढील कार्यक्रम शुक्रवार, दि. 23 जानेवारी 2026 रोजी, सकाळी 11 वा. असून महाराष्ट्र राज्य भाषा सल्लागार आणि शासनाच्या लोकराज्य मासिकाचे माजी संपादक, लेखक तथा माहिती जनसंपर्क महासंचालनालयाचे निवृत्त संचालक श्री.सुरेश वांदिले यांचे 'कार्यालयीन मराठी लेखन आणि मराठी युवकांसाठी करिअरच्या संधी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे.

## नेताजी सुभाषचंद्र बोस : अदम्य साहसाचे धगधगते प्रतीक

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात अनेक तेजस्वी तारे चमकले, परंतु ज्यांच्या नावाने आजही अंगावर शहारे येतात आणि मनात राष्ट्रभक्तीचे स्फुरण चढते, ते नाव म्हणजे 'नेताजी' सुभाषचंद्र बोस. २३ जानेवारी हा त्यांचा जन्मदिन आपण 'पराक्रम दिवस' म्हणून साजरा करतो. नेताजी केवळ एक नेते नव्हते, तर ते अदम्य साहस, जाज्वल्य राष्ट्रप्रेम आणि संघर्षाचे जिवंत प्रतीक होते.

नेताजींचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिशातील कटक येथे झाला. लहानपणापासूनच ते अत्यंत कुशाग्र बुद्धीचे होते. स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. वडिलांच्या इच्छेखातर ते इंग्लंडला गेले आणि त्याकाळी अत्यंत कठीण मानली जाणारी 'आय.सी.एस.' (ICS) परीक्षा उत्तीर्ण झाले. परंतु सुभाषबाबूंनी आय.सी.एस. (ICS) परीक्षेत यश मिळवूनही, ब्रिटिशांची चाकरी नाकारून देशसेवेचा मार्ग निवडला.



सुरुवातीला त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये राहून कार्य केले. दोनदा त्यांची काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली. मात्र, त्यांचे विचार तत्कालीन मवाळ राजकारणापेक्षा वेगळे होते. केवळ अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळणार नाही, असे वाटल्याने त्यांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग अवलंबला.

ब्रिटीश सरकारच्या नजरकैदेतून वेशांतर करून बाहेर पडणे, काबूलमार्गे जर्मनी आणि तिथून पाणबुडीने जपानचा प्रवास करणे, हा त्यांचा प्रवास एखाद्या थरारक चित्रपटासारखा वाटतो. त्यांनी सिंगापूरमध्ये 'आझाद हिंद फौजे' ची (INA) धुरा सांभाळली. "तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आजादी दूँगा!" ही त्यांची हाक ऐकून हजारो तरुण, महिला आणि सामान्य नागरिक स्वातंत्र्यासाठी बलिदान द्यायला तयार झाले. 'झाशीची राणी' या नावाने त्यांनी महिलांचे स्वतंत्र लष्करी पथक तयार केले, जे त्यांच्या दूरदृष्टीचे आणि स्त्री-शक्तीवरील विश्वासाचे दर्शन घडवते.

**आजच्या तरुणांसाठी प्रेरणा :** आजच्या बदलत्या काळात नेताजींचे विचार तरुणांसाठी केवळ वाचण्याचे विषय नसून आचरणात आणण्याचे मंत्र आहेत:

**१. निर्भीडता आणि स्वाभिमान:** नेताजींनी कधीही तडजोड केली नाही. आजच्या तरुणांनी आपल्या करिअरमध्ये किंवा आयुष्यात येणाऱ्या संकटांना न घाबरता, स्वाभिमानाने सामोरे जाणे आवश्यक आहे.

**२. शून्यातून विश्व निर्माण करण्याची जिद्द:** परदेशात जाऊन, कोणतेही मोठे आर्थिक पाठबळ नसताना त्यांनी एक शक्तिशाली लष्कर उभे केले. संसाधनांच्या अभावाचे रडगाणे न गाता, जे आहे त्यातून यश मिळवण्याची प्रेरणा आपल्याला त्यांच्याकडून मिळते.

**३. राष्ट्रीय एकात्मता:** आझाद हिंद फौजेत सर्व धर्माचे लोक खांद्याला खांदा लावून लढले. आजच्या तरुणांनी जातीय आणि धार्मिक भिंती तोडून 'राष्ट्रप्रथम' हा विचार अंगीकारणे हीच काळाची गरज आहे.

**४. कर्तृत्व आणि कष्ट:** "यश मिळवण्यासाठी आपण केवळ स्वप्न पाहून चालत नाही, तर त्यासाठी किंमत मोजावी लागते," हा नेताजींचा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे. नेताजींचे आयुष्य हे संघर्षातून यशाकडे आणि बलिदानातून अमरत्वाकडे जाणारा प्रवास आहे. त्यांचा मृत्यू हा आजही एक गूढ असला, तरी त्यांचे विचार आजही जिवंत आहेत. नेताजींच्या स्वप्नातील समर्थ, सामर्थ्यवान आणि आत्मनिर्भर भारत घडवणे, हीच त्यांना खरी मानवंदना ठरेल.

**-स्वरूप रोहिणी चाया हुले, अलिबाग**

## राष्ट्रीय 'वीर गाथा 5.0' मध्ये महाराष्ट्र अव्वल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी दिल्ली, 22:** भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून संरक्षण मंत्रालय, शिक्षण मंत्रालय आणि मायगव्ह (MyGov) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'प्रोजेक्ट वीर गाथा 5.0.' या राष्ट्रीय स्पर्धेचा निकाल जाहीर झाला आहे. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व यश संपादन केले असून, देशातील 'सुपर 100' विजेत्यांमध्ये सर्वाधिक 19 विजेते महाराष्ट्राचे आहेत. या विजेत्यांमध्ये 14 मुली आणि 5 मुलांचा समावेश आहे.

स्वातंत्र्याच्या 75 व्या वर्षानिमित्त 'आझादी का अमृत महोत्सवाअंतर्गत 2021 मध्ये सुरू झालेला हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती आणि शौर्य पुरस्कार विजेत्यांच्या पराक्रमाची जाणीव करून देण्यासाठी राबविला जातो. यंदाच्या वीर गाथा 5.0 आवृत्तीमध्ये देशातील 23 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे, यंदा प्रथमच परदेशातील 18 देशांमधील 91 सीबीएसई (CBSE) शाळांनी यात सहभाग नोंदवला, ज्यामधून परदेशातील 4 मुलांनीही विजेतेपदावर आपले नाव कोरले आहे. संपूर्ण देशातून एकूण 1.92 कोटी विद्यार्थ्यांनी या स्पर्धेसाठी नोंदणी केली होती.

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी चित्रकला (Painting/Drawing), कविता (Poem), परिच्छेद लेखन (Paragraph) आणि मल्टिमीडिया सादरीकरण अशा विविध क्षेत्रांत आपल्या कौशल्याचे दर्शन घडवले. प्राथमिक गटात (इयत्ता 3 री ते 5 वी) सानवी भिंगारडे (कविता), वर्धन फलके (चित्रकला), जान्हवी खोत (परिच्छेद लेखन), वेदिका कविताके (परिच्छेद लेखन), विधी वानखेडे (चित्रकला) आणि मंजुश्री घोरपडे (परिच्छेद लेखन) यांनी यश मिळवले.

माध्यमिक गटात (इयत्ता 6 वी ते 8 वी) अर्पित जाधव व सावी मुद्रळे यांनी मल्टिमीडिया प्रेझेंटेशनमध्ये, तर श्रावणी संकपाळ (कविता), शिवांक खोडे व शौर्य लेकुळे (चित्रकला), श्रेया उंबरकर, आदित्य गायकवाड आणि शमिका गवंडी यांनी परिच्छेद लेखनात बाजी मारली. उच्च माध्यमिक गटात (इयत्ता 9 वी ते 10 वी) अवनी खोरी (चित्रकला), समीक्षा मोझर (परिच्छेद लेखन), उच्च माध्यमिक गटात (इयत्ता 11 वी ते 12 वी) दीक्षा येलमार (परिच्छेद लेखन) आणि सिद्धी रामुगडे (परिच्छेद लेखन)यांनी राष्ट्रीय पुरस्कार पटकावला आहे.

या सर्व 100 राष्ट्रीय विजेत्यांना नवी दिल्ली येथे आयोजित विशेष सोहळयात संरक्षण मंत्रालय आणि शिक्षण मंत्रालयातर्फे प्रत्येकी 10,000 रुपये रोख आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. याशिवाय, 26जानेवारी 2026 रोजी कर्तव्य पथ येथे होणाऱ्या भव्य प्रजासत्ताक दिन संचलनाचे 'विशेष अतिथी' म्हणून उपस्थित राहण्याचा मानही या विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

## कल्याण डोंबिवलीत मंगळवारी पाणीपुरवठा बंद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बारावे, मोहिली, नेतिवली व टिटवाळा जलशुद्धीकरण केंद्र येथील विद्युत व यांत्रिकी उपकरणांची देखभाल दुरूस्ती करावयाची आहेत. या देखभाल दुरुस्तीची कामे करण्याकरिता मंगळवार दि. २७/०१/२०२६ रोजी सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत (८ तास) महानगरपालिकेच्या बारावे, मोहिली, नेतिवली व टिटवाळा जलशुद्धीकरण केंद्रामधून कल्याण (पूर्व व पश्चिम), कल्याण ग्रामिण विभाग (मांडा-टिटवाळा, वडवली, आंबिवली, शहाड, अटाळी व कल्याण ग्रामीण विभागातील इतर गावे) व डोंबिवली (पूर्व व पश्चिम) परिसरास होणार पाणी पुरवठा बंद राहणार आहे. तरी, या परिसरातील नागरीकांनी पाण्याचा साठा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन कार्यकारी अभियंता (पा.पू) यांच्याकडून करण्यात आले आहे.

## जल-जंगल-जमीन प्रश्नांसाठी माकपचे बेमुदत ठिय्या आंदोलन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** केंद्र व राज्यातील भाजप-प्रणीत सरकारांच्या धोरणांमुळे ग्रामीण व शहरी भागातील कोट्यवधी सामान्य जनतेला महागाई, बेरोजगारी, उपासमार, रोगराई आणि भूमिहीनतेसह विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. दुसरीकडे देशाची संपत्ती मोठ्या उद्योगपतींच्या ताब्यात जात आहे. लोकांमध्ये वाढत असलेला असंतोष दडपण्यासाठी हुकुमशाही उपाय आणि धर्म-जातीनिहाय फूट पाडण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**ठिय्या आंदोलनाची घोषणा**

या परिस्थितीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने भिवंडी प्रांत कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याचे जाहिर केले आहे. शुक्रवार, २३ जानेवारी, सकाळी १२ वा., नदीनाका पासून मोर्चा निघणार असून, कार्यकर्त्यांना दोन-तीन दिवसांची शिदोरी सोबत घेऊन सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**जमीन आणि पाण्याचे प्रश्न**

वनजमिनी, वरकस जमिनी, देवस्थान व इनाम जमिनी, गायरान, सरकारी, राबी आणि तळघर जमिनी अनेक वर्षे संघर्ष करूनही सरकार आपल्या नावावर करत नाही. ठाणे-पालघर जिल्ह्यात महाराष्ट्रातील पाण्याचे सर्वाधिक साठे असूनही शेकडो गावातील शेतकरी व शेतमजुरांना पिण्यासाठी आणि शेतीसाठी पाणी उपलब्ध नाही.

**रोजगार, वीज आणि कामगारांचे हक्क**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नाव बदलून, त्यातील मोडतोड करून आणि खर्च कमी केल्यामुळे ग्रामीण गरिबांना रोजगार आणि वेतनापासून वंचित करण्यात आले आहे. विजेच्या खाजगीकरणाचा भाग म्हणून स्मार्ट मीटर योजना जबरदस्तीने राबवली जात आहे, ज्यामुळे मोठ्या कंपन्यांना फायदा होत असून जनतेला लुटले जात आहे. कामगारांचे युनियन करण्याचे अधिकार आणि किमान वेतन यांवर गदा आणणारी नव्या श्रम संहिता लागू करण्यात आली आहे. तसेच रेशन, शिक्षण आणि आरोग्य व्यवस्थांवर नवीन हल्ले केले जात आहेत.

**आंदोलनाचे नेतृत्व आणि आवाहन**

जनतेचे सर्व ज्वलंत प्रश्न लक्षात घेऊन, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने जिल्हाव्यापी बेमुदत ठिय्या आंदोलन भिवंडी प्रांत कार्यालयावर आयोजित केले आहे. आंदोलनाचे नेतृत्व केंद्रीय कमिटी सदस्य आमदार कॉ. विनोद निकोले, जिल्हा सेक्रेटरी व राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ. किरण गहला, राज्य कमिटी सदस्य कॉ. भरत वळंबा यांसह अनेक नेते करणार आहेत. ठाणे जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यातून शेतकरी, शेतमजूर, कामगार, कर्मचारी, महिला, युवा, विद्यार्थी आणि सर्व धर्म, जाती व समाजातील लोकांनी आपल्या व व्यापक समाजाच्या हितासाठी यात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा कमिटीने केले आहे.

## मोफत महाआरोग्य व नेत्र तपासणी शिबीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण ग्रामीण :** कल्याण तालुक्यातील फळेगाव येथे भागुबाई जीवन प्रेरणा सामाजिक संस्था व नवयुग मित्र मंडळ फळेगांव यांनी मोफत महाआरोग्य व नेत्र तपासणी शिबिर आयोजित केले आहे. शिबिर २४ जानेवारी, सकाळी १० ते दुपारी ३ वा. चालणार आहे.

या शिबिरात डायलेसिस, कॅन्सर थेरपी, किडणी स्टोन सर्जरी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, १०० पेक्षा जास्त शस्त्रक्रिया, ECG, ब्लड टेस्ट, शुगर तपासणी, बीपी तपासणी आणि दंत तपासण्या मोफत केल्या जाणार आहेत.

तपासणीसाठी एस.एम.बीटी हॉस्पिटल, प्राथमिक आरोग्य केंद्र खडवली, सहास चॅरिटेबल फाऊंडेशन, भक्ती वेदांत हॉस्पिटल आणि शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, तसेच H.L.L. लाइफ केअर लॅब शहापूर यांचे तज्ञ डॉक्टर उपस्थित राहणार आहेत. मोफत उपचार व औषधे उपलब्ध असल्याचे संस्थेचे अध्यक्ष संजय गोमा जाधव यांनी सांगितले आहे.

## मराठी भाषा अभिजात झाल्याने बोलींना मान्यता - ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (23) -** आपल्या मातृभाषेत एक ममत्व असते. त्यामुळे आपली भाषा बोलणारा माणूस भेटला की, आपण त्याच्याशी सहजपणाने जोडले जातो. आपली मराठी भाषा ही अशीच ममत्वाची भाषा असून ती विविध बोलींनी समृद्ध केलेली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणजे काय.. तर या महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात बोलल्या जाणाऱ्या सगळ्या बोलींना मान्यता मिळाली, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांनी येथे केले.

मराठी भाषा पंधरवडानिमित्त ठाणे महानगरपालिकेच्यावतीने कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांचे 'जगणे व्हावे गाणे' या विषयावर गाणी व संवाद या कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी (22 जानेवारी) केले होते. या कार्यक्रमास उपायुक्त उमेश बिरारी, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर यांच्यासह ठाणे महापालिकेच्या विविध विभागांचे कर्मचारी उपस्थित होते. यावेळी कवी अरूण म्हात्रे यांचा सन्मान उपायुक्त उमेश बिरारी यांनी केला.

मराठीला यावर्षी अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल ते म्हणाले, "दोन हजार वर्षांहून अधिक काळ जिवंत असलेली ही भाषा आपल्या आई-वडिलांची, पूर्वजांची आणि पुढील पिढ्यांची ओळख आहे. हा सन्मान म्हणजे मराठी संस्कृतीच्या दीर्घ परंपरेला मिळालेली पावती आहे." "परदेशात एखादा मराठी माणूस बोलताना ऐकला, की क्षणात परकेपणा नाहीसा होतो. मराठी भाषेची ही आपुलकी शब्दांत मावणारी नाही," असे ते म्हणाले.

भाषा ही केवळ संवादाची साधन नसून ती माणसाची ओळख, आठवणींचा ठेवा आणि भावनांचे घर असते. आपल्या भाषेतील एक शब्दही माणसाला आपल्या मुळांशी जोडून ठेवतो. यावेळी त्यांनी मराठीच्या विविध बोलीभाषांचा उल्लेख केला. "मालवणी, अहिराणी, वऱ्हाडी, कोकणी अशा अनेक बोलीभाषा म्हणजे मराठीच्या समृद्धीचे रंग आहेत. शब्द वेगळे असले तरी भावना एकच आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. अनेकांना आपल्या बोलीभाषेत बोलताना लाज वाटते, परंतु भाषेबद्दल लाज वाटणे योग्य नसून ती आपली ताकद आहे. "कविता जशी शब्दांतून जीवन रंगवते, तशीच भाषाही माणसाच्या जगण्याला अर्थ देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कवी आपल्या आजूबाजूला घडत असलेल्या गोष्टीचे वर्णन आपल्या कवितांमध्ये करत असतो. कोकणातील पावसाचे सौंदर्य, मातीचा सुगंध, समुद्राची किनार असे चित्रण कवी मंगेश पाडगांवकर त्यांच्या 'वेंगुल्याचो पाऊस' या कवितेत केले असल्याचे सांगत त्यांनी कविता सादर केली.

यावेळी त्यांनी अनेक कवींच्या कवितांवर भाष्य केले. नारायण सुर्वे यांच्या कविता म्हणजे उपेक्षितांचे बोलके दु:ख आणि कष्टकरी माणसांच्या जगण्याचा आरसा असल्याचे त्यांनी नमूद केले. अनेक कविता या मुखोद्गत असल्याचे सांगत त्यांनी त्यांची 'उंच माझा झोका' ही कविता सादर करत उपस्थितांची दाद मिळवली.

मराठी भाषा पंधरवडा हा आज महाराष्ट्रात सर्वच ठिकाणी साजरा होतो आहे. आपली मराठी भाषा ही समृद्ध आहे, हा समृद्ध भाषेचा वारसा आपल्या पुढील पिढीपर्यंत पोहचवण्यासाठी आपल्या घरात मराठी पुस्तके असणे गरजेचे आहे. आज जर कोणी मला विचारले की तुम्ही श्रीमंत आहात का? तर मी अभिमानाने सांगेन की मराठी पुस्तकांची श्रीमंती माझ्याकडे आहे, भाषेने आपण समृद्ध होत असतो त्यामुळे या मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त पाच मराठी पुस्तके विकत घ्या असा सल्लाही त्यांनी यावेळी दिली.

मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त ठाणे महानगरपालिकेच्यावतीने मंगळवार 27 जानेवारी रोजी सायं. 4.00 वा. कवीसंमेलनाचे आयोजन केलेआहे. तर मराठी भाषा पंधरवडा समारोपादिवशी 28 जानेवारी रोजी महापालिका भवन येथून ग्रंथदिडींचे काढण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमास ठाणेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## MIDC शहाड पंप: उद्या पाणीपुरवठा बंद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (MIDC) शहाड पंपीग स्टेशन व जलशुद्धीकरण केंद्रातील महत्त्वाच्या साप्ताहिक विद्युत देखभाल व दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे शुक्रवार दिनांक 23 जानेवारी 2026 रोजी स. 11.00 वाजले पासून ते संध्याकाळी 7.00 वाजेपर्यंत (8 तासाकरिता) जुना व नवीन मुख्य संतुलन जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा बंद राहील. तसेच देखभाल दुरुस्ती कामा नंतर MIDC कडून पाणीपुरवठा कमी दाबाने होण्याची शक्यता आहे. कृपया संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

## भविष्यवेध



शुक्रवार
२३ जानेवारी २०२६

**मेष**
तुम्हाला तुमच्या भावंडांकडून पाठिंबा मिळेल. आज एखाद्या कौटुंबिक कार्यक्रमामुळे तुमचे वेळापत्रक बदलू शकते. बहुतेक कामे आज पूर्ण होतील.

**वृषभ**
तुमचे मन एकाग्र राहील. सामाजिक कार्यात तुमची आवड वाढू शकते. आज जोडीदाराकडून तुम्हाला पाठिंबा मिळेल. भागीदारी फायदेशीर ठरू शकते.

**मिथुन**
व्यावसायिक महत्त्वाच्या बैठकांना उपस्थित राहू शकतात. तुम्ही कोणाकडून घेतलेले कर्ज परत फेडाल, डोक्याचं टेन्शन मिटेल. कामावर लक्ष केंद्रित करा.

**कर्क**
ओव्हरटाईम करावा लागू शकतो. . आर्थिक बाबींमध्ये लोकांवर जास्त विश्वास ठेवणे टाळावे. कोणालाही पैसे देण्यापूर्वी विचारपूर्वक विचार करणे चांगले.

**सिंह**
लोकांवर विश्वास ठेवणं टाळा. कोणालाही पैसे उधार देण्यापूर्वी नीट विचार करा मग निर्णय घ्या . जोडीदारासोबत धार्मिक स्थळाला भेट द्याल .

**कन्या**
तुमच्या वागण्यात सकारात्मक बदल केल्याने तुम्हाला काही नवीन मित्र बनण्यास मदत होईल. तुम्हाला इतरांना मदत करण्याची संधी मिळेल.

**तुळ**
बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस खास आहे. तुमच्या आयुष्यातील सर्व समस्या लवकरच दूर होतील.

**वृश्चिक**
शत्रू कदाचित त्यांचे अंतर राखतील. लाकूड व्यापारात गुंतलेल्यांना महत्त्वाचे प्रकल्प मिळतील. लेखकांनी लिहीलेल्या नव्या कथेला चांगली पसंती मिळेल.

**धनु**
यशस्वी प्रवासासाठी तुमच्या वडिलांचे आशीर्वाद घ्या. तुमच्या जोडीदाराला प्रगतीची चांगली संधी मिळेल. करिअर करणाऱ्या व्यावसायिकांना फायदा होईल.

**मकर**
तुम्ही कुटुंबासह रात्री चित्रपट पाहण्याची योजना आखू शकता. तुम्ही तुमच्या मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीला उपस्थित राहाल.

**कुंभ**
तुम्हाला इतर मित्रांसोबत वेळ घालवण्याची संधी मिळेल. आज तुम्ही एक नवीन कौशल्य शिकू शकता, जे भविष्यात नक्कीच फायदेशीर ठरेल.

**मीन**
प्रेमी जोडीदारांसाठी आजचा दिवस चांगला आहे. तुम्ही एखाद्या चांगल्या रेस्टॉरंटमध्ये जाऊन मनपसंत जेवणाचा आस्वाद घ्याल.

दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/




# आमचे नगरसेवक डांबून ठेवले !

## ठाकरे गटाचा शिवसेना आणि मनसेवर गंभीर आरोप



**महापालिकेच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन बंधू एकत्र येत शिवसेना (शिंदे) व भाजपा यांच्या विरोधात मैदानात उतरले होते. मात्र निवडणुकीनंतर मनसेच्या नगरसेवकांनी शिवसेना (शिंदे) पक्षाला पाठिंबा जाहीर केल्याने राजकीय समीकरणे झपाट्याने बदलताना दिसत आहेत. या घडामोडींवरून आरोप-प्रत्यारोपांचे फेरे सुरू झाले आहेत.**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत सत्ता स्थापनेच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून, येथील राजकारण सध्या चांगलेच तापले आहे. एकीकडे सत्ता स्थापनेसाठी गणिते मांडली जात असतानाच, दुसरीकडे नगरसेवकांना डांबून ठेवल्याचे गंभीर आरोप होत असल्याने राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.

या महापालिकेच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन बंधू एकत्र येत शिवसेना (शिंदे) व भाजपा यांच्या विरोधात मैदानात उतरले होते. मात्र निवडणुकीनंतर मनसेच्या नगरसेवकांनी शिवसेना (शिंदे) पक्षाला पाठिंबा जाहीर केल्याने राजकीय समीकरणे झपाट्याने बदलताना दिसत आहेत. या घडामोडींवरून अनेक प्रश्न उपस्थित होत असून, आरोप-प्रत्यारोपांचे फेरे सुरू झाले आहेत.

दरम्यान, शिवसेना (ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी अल्पेश भोईर यांनी गंभीर आरोप करत त्यांच्या पक्षाचे काही नगरसेवक डांबून ठेवल्याचा दावा केला आहे. माध्यमांशी बोलताना भोईर म्हणाले की, कल्याण-डोंबिवली महापालिकेत शिवसेना (ठाकरे) पक्षाचे एकूण ११ नगरसेवक निवडून आले आहेत. परवा पक्षाचा नगरसेवकांचा गट स्थापन करताना ७ नगरसेवक उपस्थित होते. मात्र उर्वरित ४ नगरसेवक कुठे आहेत, ते कोणाच्या ताब्यात आहेत, याबाबत कोणतीही स्पष्टता देण्यात आलेली नाही.

भोईर यांनी पुढे सांगितले की, मनसेचे नेते राजू पाटील यांनी स्थापन केलेल्या गटात ५ नगरसेवक असल्याचे जाहीर झाले. तसेच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मनसे आणि शिंदे गटात युती झाल्याचे वक्तव्य केले. मात्र या दोन्ही वक्तव्यांमध्ये शिवसेना (ठाकरे) पक्षाचे ४ नगरसेवक कुठे आहेत, याबाबत मौन बाळगण्यात आले आहे.

हे चारही नगरसेवक आमच्या संपर्कात असून, ते वारंवार फोन करून आम्हाला डांबून ठेवल्याचे सांगत आहेत. आमच्या इच्छेविरुद्ध आम्हाला थांबवण्यात आले असून, शिंदे गट किंवा मनसेसोबत जाण्याची आमची कोणतीही इच्छा नाही, असे त्यांनी स्पष्टपणे कळवले असल्याचा दावा भोईर यांनी केला.

यासंदर्भात भोईर यांनी संबंधित पक्षांना आव्हान देत सांगितले की, ज्या नगरसेवकांच्या ताब्यात आमचे नगरसेवक आहेत, त्यांनी त्यांना प्रसारमाध्यमांसमोर आणून त्यांची भूमिका स्पष्ट करावी. आजचा दिवस आम्ही वाट पाहू. जर तसे झाले नाही, तर आमचे नगरसेवक हरवल्याची तक्रार स्थानिक पोलीस ठाण्यात दाखल करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, एकूण १२२ जागा असलेल्या कल्याण-डोंबिवली महापालिकेत सत्ता स्थापनेसाठी ६२ नगरसेवकांचे संख्याबळ आवश्यक आहे. शिवसेना (शिंदे) गटाकडे ५३ नगरसेवक असून भाजपकडे ५० नगरसेवक आहेत. भाजपाचे अवलंबित्व कमी करण्यासाठी शिंदे गटाने मनसेच्या ५ नगरसेवकांचा पाठिंबा मिळवत हालचाली वेगाने सुरू केल्याचे चित्र आहे. तसेच इतर पक्षांकडूनही पाठिंबा मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर, येत्या काही दिवसांत कल्याण-डोंबिवली महापालिकेतील सत्ता स्थापनेचे राजकारण नेमके कोणते वळण घेते, याकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## वसई विरार पालिकेत
# बविआसाठी महापौर निवडीचा मार्ग मोकळा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

**वसई :** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी बहुजन विकास आघाडीकडून आजीव पाटील, प्रवीण शेट्टी,कन्हैया बेटा भोईर आणि रंजना लाडक्या थालेकर यांची नावे राजकीय वर्तुळात रंगू लागली आहेत. शहरांच्या 17 महापालिकेसाठी खुल्या प्रवर्गाचे आरक्षण गुरुवारी 22 जानेवारी रोजी अधिकृतपणे जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे पुढील महापौर निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या महापौर पदाच्या चर्चेला आता ठोस दिशा मिळाली आहे. नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत बहुजन विकास आघाडीने बहुमत मिळवत पुन्हा एकदा महापालिकेवरील आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. त्यामुळे वसई विरार महानगरपालिकेचा पुढील महापौर बहुजन विकास आघाडीचाच असणार हे जवळपास स्पष्ट झाले आहे. खुल्या प्रवर्गाचे आरक्षण निश्चित झाल्याने गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेली अनिश्चितता आता संपुष्टात आली आहे. या पार्श्वभूमीवर बहुजन विकास आघाडीकडून महापौर पदासाठी कोण पुढे येणार याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे. पक्षाचे संघटनात्मक काम पाहणारे आजीव पाटील, माजी महापौर प्रवीण शेट्टी, पक्षाचा महत्वाचा चेहरा म्हणून ओळखले जाणारे कन्हैया बेटा भोईर तसेच महिला नेतृत्व म्हणून रंजना लाडक्या थालेकर यांची नावे संभाव्य उमेदवार म्हणून चर्चेत आहेत. या नावांमुळे पक्षांतर्गत हालचाली वाढल्या असून कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकतेचे वातावरण आहे. मात्र महापौर पदाचा अंतिम निर्णय पक्ष नेतृत्वाकडूनच घेतला जाणार असून, अधिकृत घोषणा झाल्यानंतरच चित्र स्पष्ट होणार आहे.

## ठाणे महापालिकेत बसणार एससी प्रवर्गाचा महापौर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ● प्रतिनिधी / दि. २२**

ठाणे महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी अखेरीस सोडत जाहीर करण्यात आली आहे. ठाणे महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी एससी प्रवर्गाच्या ठाण्यातील विजयी उमेदवारांना हिरवा कंदील मिळाला आहे. ठाणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांमध्ये शिवसेना- भाजप महायुतीचे 103 नगरसेवक निवडून आले आहेत. त्यांमध्ये शिवसेनेचे 75 नगरसेवक आणि भाजपचे 28 नगरसेवक विविध प्रभागांमधून निवडून आले आहेत. अलीकडे ठाण्याच्या महापौर पदासाठी विविध राजकारण्यांच्या कुटुंबातल्या नगरसेवकांचे नाव घेतले जात होते मात्र ठाणे महानगरपालिका महापौर पदासाठी सोडत आरक्षण दिलेल्या एससी प्रवर्गाच्या आराखड्याने ठाण्यातील बऱ्याच विजयी नगरसेवकांनी आखलेल्या राजकीय रणनीती अक्षरशः कोलमडल्याचे कळते.

# "कैसा हराया" विरोधात आमदार निरंजन डावखरे यांची मुंब्रा पोलीस ठाण्यात तक्रार



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

मुंब्रा शहरातून एआयएमआयएम पक्षाकडून नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या सहार युनूस शेख या सध्या चांगल्याच चर्चेत आहेत. सहर शेख यांच्यासह एआयएमआयएमचे चार नगरसेवक निवडून आल्याने राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना हा धक्का मनाला जातो. या विजयानंतर भाषण करताना शेख यांनी" कैसा हराया, अभी हमलोगो को मुंब्रा को पुरा हरा कर देना है" असे वक्तव्य करत आव्हाडांना डिवचले. त्यांच्या या भाषणावर सर्वत्र विविध प्रतिक्रिया उमटत आहे. असे असतानाचा आता भाजपा आमदार निरंजन डावखरे यांनी ज्येष्ठ भाजप नेते डॉ. किरीट सोमय्या यांच्यासमवेत या वक्तव्याच्या विरोधात मुंब्रा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. यानंतर पोलिसांनी सहार शेख यांना नोटीस बजावली.

मुंब्याला हिरवं करायचं आहे, अशा अशायाचं ते विधान होतं, आता त्यांच्या या वक्तव्यावरून त्या अडचणीत आल्या आहेत. पोलिसांनी सहर शेख आणि त्यांचे वडील युनिश शेख यांना नोटीस बजावली आहे. ज्यामुळे समाजात असंतोष निर्माण होईल, असं भाषण करू नये, असं या नोटीसमध्ये पोलिसांनी म्हटलं आहे. तसेच सोशल मीडियावर बोलताना देखील या पद्धतीचे वक्तव्य टाळा असंही पोलिसांनी म्हटलं आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६८ नुसार मुंब्रा पोलिसांनी ही नोटीस बजावली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या वक्तव्याची दखल आम्ही घेतली आहे. त्यांना अशा प्रकारची वक्तव्यं करु नका म्हणून बजावलं आहे. तसंच नोटीस बजावली आहे असं पोलिसांनी म्हटलं आहे.



## 'मुंब्रा हिरवे करण्याच्या वक्तव्यावरुन सहार शेख अडचणीत

**ज्येष्ठ भाजप नेते डॉ. किरीट सोमय्या यांच्यासमवेत आज मुंब्रा पोलीस स्थानकात हजर राहून, "मुंब्रा को हरा बना देंगे" अशा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या व समजाविघातकी वक्तव्य करणाऱ्या AIMIM नेत्यांविरुद्ध आम्ही तक्रार दाखल केली आहे. महापालिका निवडणुकीनंतर AIMIM चे काही नेते मुंब्रामध्ये प्रक्षोभक, हिंदूविरोधी आणि चिथावणीखोर भाषणांच्या माध्यमातून वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत. सार्वजनिक शांतता, कायदा-सुव्यवस्था आणि सामाजिक सलोखा अबाधित राखण्यासाठी अशा वक्तव्यांना कठोरपणे आव्हान देणे व योग्य ती कारवाई होणे आवश्यक आहे, ही ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली. या प्रसंगी आमच्या समवेत भाजपच्या पदाधिकारी ॲड. अनुसया भगत, मुंब्रा मंडल अध्यक्ष श्री. सुजित गुप्ता, मुंब्रा-कौसा मंडल अध्यक्षा सौ. नाझिया तांबोळी, मुंब्रा मंडल सल्लागार श्री. अनिल भगत तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.** ● **निरंजन डावखरे, भाजपा आमदार**

# एकवेळ भाजपसोबत निर्णय घेऊ, पण...

## शिंदेसेनेसोबत युतीवर राऊतांचे कडवे विधान

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

**ठाणे :** काळच्या पत्रकार परिषदेत खासदार संजय राऊत यांनी कल्याण-डोंबिवली महापालिकेतील शिंदेसेनेसोबतच्या युतीवर कडवे विधान केले. "नीतीमत्ता ओंडक्यासारखी वाहून जाऊ नये," असे सांगत त्यांनी मनसेचा घरोबा उद्धव सेनेला मान्य नसल्याचे स्पष्ट केले. राऊतांनी या वेळी शिंदे गटाशी कधीही युती करणार नाही, तर जिथे आवश्यक असेल तिथे भाजपसोबत निर्णय घेऊ असेही सांगितले.

राऊतांच्या या वक्तव्याने स्थानिक राजकारणात उधाण निर्माण केले आहे. कल्याण-डोंबिवली महापालिकेत शिवसेना (शिंदे) आणि भाजप यांच्या कडवी स्पर्धेनंतर मनसेच्या काही नगरसेवकांनी शिंदे गटाला पाठिंबा देण्याचा प्रस्ताव मांडल्याचे समोर आले. मात्र राऊतांच्या स्पष्ट भूमिकेमुळे हा प्रस्ताव अद्याप कोणत्याही प्रकारे अंमलात आलेला नाही. त्यांनी पत्रकार परिषदेत पुढे सांगितले की, "ज्या ठिकाणी अत्यंत अस्थिरता आहे, तिथे आम्ही भाजपसोबत निर्णय घेऊ; परंतु शिंदेसेनेसोबत कधीही जाणार नाही. इतर कोणतेही पर्याय असतील, त्यासंदर्भात पक्षप्रमुख निर्णय घेतील. परस्पर कुणी निर्णय घेणार नाही," असेही त्यांनी स्पष्ट केले.

राजकीय विश्लेषकांच्या मते, राऊतांचे हे विधान केवळ कल्याण-डोंबिवलीमहापालिकेपुरते मर्यादित नसून, राज्यातील महापालिका महापौर पदांच्या आरक्षण व सत्ता स्थापनेसंबंधीच्या गतीशील राजकीय घडामोडींवरही प्रभाव टाकणार आहे. आरक्षण सोडतीच्या पार्श्वभूमीवर महापौर पदासाठीच्या चर्चेत आता भाजप-मनसे-शिंदे गट यांच्यातील संभाव्य समीकरणांवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ओबीसी नगरसेवकांमध्ये 'उल्हास'

## उल्हासनगर महापालिकेचे महापौरपद ओबीसीसाठी आरक्षित; च्या आशा पल्लवीत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

**उल्हासनगर : उल्हासनगर महापालिका महापौरपद नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी)साठी राखीव झाल्याने शिंदेंच्या शिवसेनेत निवडून आलेल्या या प्रवर्गातील नगरसेवकांच्या महापौरपदाच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. यंदा उल्हासनगर महापालिकेच्या ७८ जागांपैकी २१ जागा ओबीसीसाठी आरक्षित होत्या. चार सदस्यीय प्रभाग पद्धतीत २० प्रभागात किमान एक आणि एका प्रभागात दोन जागा ओबीसीसाठी राखीव होत्या. शिंदेंच्या शिवसेनेतील जुन्या, नव्या, मराठी तसेच सिंधी नगरसेवक महापौरपदासाठी वेध लावले आहेत, तर खुल्या प्रवर्गातून लढलेल्या काही ज्येष्ठ ओबीसी नगरसेवकांच्या आशाही पल्लवीत आहेत.**

**उल्हासनगर मनापात सर्वाधिक १० ओबीसी नगरसेवक भाजपातून, ९ शिंदेंच्या सेनेतून, तर साई पक्ष आणि वंचित बहुजन आघाडी कडून प्रत्येकी एक-एक ओबीसी नगरसेवक निवडून आले आहेत. दोन्ही प्रमुख पक्षांना समसमान ३७ जागांवर विजय मिळाल्यानंतर, अपक्ष आणि वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेवकांच्या सहकार्याने शिंदेंची शिवसेना महापौरपदासाठी सज्ज आहे. महापौरपद ओबीसीसाठी राखीव झाल्यामुळे शिंदेंच्या शिवसेनेतील ९, साई पक्षातील एक आणि खुल्या प्रवर्गातून निवडून आलेले अनेक ओबीसी नगरसेवक यांचे महापौरपदाच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत, ज्यामुळे उल्हासनगर महापालिकेतील सत्ता स्थापनेसाठी उत्सुकता निर्माण झाली आहे.**

### ■ ज्येष्ठ नगरसेवक स्पर्धेतून बाद

उल्हासनगर महापालिकेत सत्ता स्थापनेसाठी स्थानिक खासदार श्रीकांत शिंदे यांनी मोठी खेळी खेळली असून, महापौर निवडीत त्यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. महापौरपदासाठी मराठी की सिंधी चेहरा यावरही चर्चा रंगली आहे, ज्यामुळे उल्हासनगरचा नवा महापौर कोण असेल याबाबत शहरात उत्सुकता निर्माण झाली आहे. यंदा उल्हासनगर महापालिकेतील शिवसेनेतील अनेक ज्येष्ठ नगरसेवक महापौर पदाच्या स्पर्धेतून बाद झाले आहेत. या नावांमध्ये राजेंद्रसिंह भुल्लर, लीलाबाई आशान, अरूण आशान, दिलीप गायकवाड, कलवंतसिंह सहोता यांचा समावेश आहे. या नगरसेवकांना महापौर पदासाठी संधी मिळालेली नसल्यामुळे, त्यांना पुन्हा इतर पदांसाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.



**1 सत्ता स्थापनेची पार्श्वभूमी – महापालिकेत शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप यांच्यात कडवी लढत झाली. ४० जागांवर बहुमत मिळाल्यामुळे शिवसेना महापौर पदासाठी सज्ज आहे, परंतु महापौरपद ओबीसीसाठी राखीव असल्यामुळे अनेक उमेदवारांच्या आशा पल्लवीत झाल्या.**

**2 ज्येष्ठ नगरसेवक बाद – उल्हासनगरच्या काही ज्येष्ठ आणि अनुभवी नगरसेवकांना महापौर पदाची संधी मिळालेली नाही, ज्यात राजेंद्रसिंह भुल्लर, लीलाबाई आशान, अरूण आशान, दिलीप गायकवाड, कलवंतसिंह सहोता यांचा समावेश आहे.**

**3 स्थानिक खासदार श्रीकांत शिंदे यांनी महापौर निवडणुकीसाठी महत्त्वाची भूमिका बजावली असून, कोणता चेहरा (मराठी की सिंधी) महापौर होईल याबाबत उत्सुकता आहे.**

## भाजप महापौरपदाच्या शर्यतीतून बाहेर ?

पान १ वरून ▶▶▶ आहे. हर्षाली थवील–चौधरी या दुसऱ्यांदा निवडून आलेल्या नगरसेविका असून, मागील कार्यकाळात त्यांनी मूलभूत सुविधांसाठी मंत्रालयातून कोट्यवधींचा निधी आणत सुमारे १८ ते २० कोटी रुपयांचा विकास निधी खर्च केला आहे. त्यामुळे त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. दुसरीकडे, पहिल्यांदाच नगरसेवक झालेले किरण भांगले हे शहरप्रमुख रवी पाटील यांचे समर्थक असून, त्यांना महापौरपदी विराजमान करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. पालिकेतील पक्षीय बलाबल पाहता भाजपकडे ५०, शिवसेनेकडे ५३ जागा असल्या तरी सेनेने ५९ नगरसेवकांची आघाडी उभारली आहे. ठाकरे गटाच्या नगरसेवकांची भूमिका अद्याप स्पष्ट नसली तरी सध्याची स्थिती शिवसेनेच्या बाजूने आहे. महापौरपदाचे आरक्षण शिवसेनेच्या पारड्यात पडल्याने भाजपने महायुतीधर्म पाळत शिवसेनेला शुभेच्छा दिल्या आहेत. आत्तापर्यंत कल्याण पश्चिमेला चार वेळा महापौरपद मिळाले असले तरी टिटवाळा–आंबिवली परिसराला अद्याप नेतृत्वाची संधी मिळालेली नाही. त्यामुळे यावेळी त्या भागाला प्रतिनिधित्व मिळणार का, याकडेही लक्ष लागले आहे. किरण भांगले की हर्षाली थवील–चौधरी यापैकी कोणाच्या गळ्यात महापौरपदाची माळ पडणार, यावर राजकीय वर्तुळासह सर्वसामान्यांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

# मिरा भाईंदर महापालिकेच्या महापौर पदावर भाजपाच्या महिलांचा दावा- मनसेचा संताप

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

**भाईंदर :** भाईंदरः मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील महापौरपद महिला खुल्या प्रवर्गासाठी राखीव झाल्यानंतर भाजपच्या महिला नगरसेविका महापौरपदी बसण्याच्या दाव्यावर राजकीय गदारोळ उभा राहिला आहे. अनिता पाटील, शानु गोहिल, वर्षा भानुशाली, वंदना पाटील, निला सोन्स, दीपिका अरोरा, स्नेहा पांडे, दीप्ती भट, कुसुम गुप्ता, नयना म्हात्रे व सुनीता जैन या ११ नगरसेविकांमध्ये सर्वात ज्येष्ठ व अनुभवी अनिता पाटील, वंदना




पाटील, शानु गोहिल व नयना म्हात्रे या चार नगरसेविकांचा प्रमुख दावा मानला जात आहे. भाजपकडे एकहाती सत्ता असून ९५ जागांपैकी ७८ जागा त्यांनी जिंकल्या आहेत. काँग्रेसकडे १३, शिवसेना (शिंदे) गटकडे ३ आणि अपक्ष १ जागा असून, आमदार नरेंद्र मेहता निर्णायक भूमिका बजावणार आहेत. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात महापौर निवडणूक होण्याची शक्यता आहे.

### ■ मनसेचा संताप

मिरा-भाईंदर महापौरपदी खुल्या प्रवर्गातील महिला राखीव झाल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेत शहरातील प्रमुख चौक, रस्ते आणि गर्दीच्या भागात बॅनरबाजी केली आहे. या बॅनरवर "मिरा-भाईंदरचा महापौर मराठीच व्हावा अन्यथा विरोध" असा संदेश देण्यात आला आहे, ज्यामुळे शहरात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. मनसेच्या या मोहिमेला शहर अध्यक्ष संदीप राणे यांनी नेतृत्व दिले असून, भाजपच्या महापौरपदावरील दाव्यावर प्रश्न निर्माण करण्याचा इरादा त्यांनी स्पष्ट केला आहे. यामुळे फेब्रुवारीत होणाऱ्या महापौर निवडीपूर्वी राजकीय तापमान वाढल्याचे दिसून येत आहे आणि शहरातील राजकारण जास्तच रंगतदार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



ठाणे ■ शुक्रवार
२३ जानेवारी २०२६
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# पेण वाशीनाका येथे सिलेंडर टेम्पोला भीषण आग ■ ९ सिलेंडरचा ब्लास्ट, टेम्पो जळून खाक



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण(प्रतिनिधी) :** पेण वाशी नाका येथे एका सिलेंडर टेम्पोला अचानक आग आग लागली. टेम्पोत सिलेंडर असल्याने आगीने आणखी भडका घेतला.आग लागल्याचे दिसताच नागरिक भयभीत झाले आणि सैरावैरा पळू लागले.गुरुवार दिनांक २२ जानेवारी रोजी पेण शहराकडून भारत गॅस सिलेंडर घेऊन सिद्धार्थ विठोबा ठाकूर वय ३१ राहणार काळेश्री हे वडखळ दिशेने जात असताना वाशी नाका येथे टाटा मेगा एक्सल टेम्पो क्रमांक MH 06 BW0030 वाहनाचे इंजिनला अचानक आग लागल्याची घटना घडली.या आगीत टेम्पो जाळून खाक झाला तसेच भरलेल्या ४८ सिलेंडर पैकी ९ सिलेंडरचा ब्लास्ट झाला.या घटनेची माहिती मिळताच पेण नगरपरिषदेचे अंगणीशामक दलाचे जवान तिथे पोहचले त्यांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. तसेच नागोठणे रिलायन्स इंडस्ट्रीज अग्निशामक आणि जेएसडबलू अग्निशामक तिथे पोहचले. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. यावेळी घटनास्थळी पेण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप बागुल, सहायक पोलिस निरीक्षक विक्रम नवरखेडे,पीएसआय शिल्पा वेंगुर्लेकर आणि वाहतूक शाखा अलिबागचे पीआय भुजबळ व त्यांचे अंमलदार यांनी झालेल्या घटनेवर तत्काळ नियंत्रण मिळविले आणि पंच नामा केला आहे

# भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन रोहयो मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते होणार ध्वजारोहण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त रायगड जिल्ह्यातील मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ सोमवार, दि.२६ जानेवारी २०२६ रोजी रोहयो, फलोत्पादन,खारभूमी विकास मंत्री भरत विठाबाई मारुती गोगावले यांच्या हस्ते अलिबाग पोलीस मुख्यालय मैदान येथे सकाळी ९.१५ वा.संपन्न होणार आहे.

ध्वजारोहणाच्या वेळी राष्ट्रीय/समारंभीय पोशाख परिधान करण्यात यावा. ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ८-३० ते १० वाजेदरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वतःचा ध्वजारोहणाचा समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी ८-३० पूर्वी किंवा सकाळी १० वाजेनंतर करावा.

ध्वज संहितेतील सर्व नियमांचे व सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. कागदी राष्ट्रध्वजाचा वापर ध्वजसंहितेच्या तरतुदी मध्ये नमूद केल्यानुसारच करावा. ख़राब झालेले माती लागलेले राष्ट्रध्वज गोणी किंवा कपड्यामध्ये व्यवस्थित बांधुन शिऊन बंद करावेत. अशासकीय संस्था, इतर संघटनांनी तसेच नागरिकांनी हे राष्ट्रध्वज तहसिल कार्यालयात सुपूर्द करावेत. राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखावा. भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमास सर्वांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे जिल्हा प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

# अभ्यासासोबत खेळही महत्त्वाचा : सीईओ रणजित यादव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकासाला चालना देण्यासाठी जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत केंद्र, तालुका व जिल्हा पातळीवर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. त्याच अनुषंगाने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा दि. २१ जानेवारी, २०२६ रोजी ऑल सेट्स हायस्कूल, भवाळे, तालुका भिवंडी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धांचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेची सुरुवात क्रीडा मशाल प्रज्वलन करून तसेच पाच तालुक्यांतील विद्यार्थी प्रतिनिधींनी मानवंदना देऊन करण्यात आली.



यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासासोबतच मैदानी खेळांना तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच शिस्त, संघभावना व नेतृत्वगुण विकसित होतात. निरोगी व सुदृढ आयुष्यासाठी दररोज खेळाची सवय लागणे गरजेचे आहे. तसेच ठाणे जिल्ह्यात विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी सुरू असलेल्या 'दिशा' उपक्रमाच्या पुढील टप्पा म्हणून 'मिशन भरारी' हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात येत असल्याची घोषणा त्यांनी केली. या उपक्रमांतर्गत गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना देशातील नामांकित संशोधन संस्था व शैक्षणिक केंद्रांना भेटी देण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविकात शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात खेळाचे महत्त्व विशद केले. तसेच जिल्हा परिषदेमार्फत विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये केंद्र पातळीवर प्रथम क्रमांक मिळविलेले संघ तालुका पातळीवर, तर तालुका पातळीवर प्रथम आलेले संघ जिल्हा पातळीवरील स्पर्धांसाठी पात्र ठरले होते. या स्पर्धा सांघिक व वैयक्तिक प्रकारात तसेच मुले व मुली स्वतंत्र गटात घेण्यात आल्या. सांघिक स्पर्धांमध्ये खो-खो, कबड्डी, लंगडी, लेझीम या खेळांचा समावेश होता, तर वैयक्तिक स्पर्धांमध्ये ५० मीटर व १०० मीटर धावणे, २५x४ रिले, लांब उडी व संगीत खुर्ची या खेळांचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद घेतला.

कार्यक्रमास गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती भिवंडी संजय अस्वले, गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती शहापूर हिराजी वेखंडे, विस्तार अधिकारी शिक्षण, केंद्रप्रमुख, मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक तसेच प्राथमिक शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. स्पर्धांच्या यशस्वी आयोजनाची जबाबदारी विस्तार अधिकारी शिक्षण आशिष झुंजारराव यांनी समर्थपणे पार पाडली.

स्पर्धेदरम्यान मनीषा गामणे व रविंद्र तरे यांनी प्रभावी सूत्रसंचलन करून विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व आनंदाचे वातावरण निर्माण केले. संपूर्ण स्पर्धा उत्साहात, शिस्तबद्ध आणि खेळाडू वृत्तीने पार पडल्या.

# वाशिंद परिसरात माघी गणपतीची उत्साहात स्थापना



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशिंद :** वाशिंद परिसरात मोठ्या प्रमाणात माघी गणपतीची स्थापना करण्यात आली आहे.

माघ महिन्यात तुरळक ठिकाणी माघी गणपतीबाप्पाची स्थापना केली जात असे. आता मात्र प्रत्येक गावात घरगुती तर काही गावात सार्वजनिक माघी गणेउत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जात आहे. गुरवार दि. २२ जानेवारी रोजी गणेश जयंती असल्याने पहाटेपासून गणपती बाप्पाच्या आगमनाची लगबग सुरु झाल्याची दिसून आली.ढोल टाश्याच्या गजरात तर काही ठिकाणी पारंपरिक पद्धतीने भजनाचा गजर करीत गणपती बाप्पाचे आगमन होत होते. बाळगोपाळ गणेश भक्त नटून थटून तयार असल्याचे चित्र दिसून येत होते. गणपती बाप्पा मोरया या गजराने परिसर दणाणून केला होता. अनेक ठिकाणी हा उत्सव अडीच दिवसच साजरा केला जात असल्याने सकाळ पासून गणपती बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी गणेशभक्त घराच्या बाहेर जाताना दिसून येत होते.

# कल्याणचा महाराजाचे मोठ्या उत्साहात आगमन

## जय शंभो नारायण मित्र मंडळाच्या वतीने माघी गणेशोत्सवाचे आयोजन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील खडकपाडा साई चौक येथील जय शंभो नारायण मित्र मंडळाच्या वतीने आयोजित कल्याणचा महाराजा या माघी गणपतीचे मोठ्या उत्साहात आगामन झाले. गणरायाची २२ फुटांची भव्यादिव्य मूर्ती असून या कल्याणचा महाराजाला १५० ढोल ताश्यांची मानवंदना देण्यात आली. अशाप्रकारे कल्याणचा महाराजाचे मोठ्या उत्साहात आगमन कल्याण नगरीत झाले. या मंडळाचे अध्यक्ष शिवम जाधव, उपाध्यक्ष उमेश महाजन, सचिव आकाश आव्हाड आहेत.

# पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते साकेत पोलीस मैदानावर होणार ध्वजारोहण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** भारताच्या 77 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ठाणे जिल्ह्यातील मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ सोमवार, दि.26 जानेवारी 2026 रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते साकेत पोलीस मैदान येथे सकाळी 9.15 वा.संपन्न होणार आहे.

ध्वजारोहणाच्या वेळी राष्ट्रीय/समारंभीय पोषाख परिधान करण्यात यावा. ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी 8-30 ते 10 वाजेदरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वतःचा ध्वजारोहणाचा समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी 8-30 पूर्वी किंवा सकाळी 10 वाजेनंतर करावा. ध्वजसंहितेतील सर्व नियमांचे व सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. कागदी राष्ट्रध्वजाचा वापर ध्वजसंहितेच्या तरतूदीमध्ये नमूद केल्यानुसारच करावा. खराब झालेले माती लागलेले राष्ट्रध्वज गोणी किंवा कपड्यामध्ये व्यवस्थित बांधून शिवून बंद करावेत. अशासकीय संस्था, इतर संघटनांनी तसेच नागरिकांनी हे राष्ट्रध्वज तहसिल कार्यालयात सुपूर्द करावेत. राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखावा.भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या ध्वजारोहण सोहळ्यास जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक, आणीबाणी सत्याग्रही, लोकप्रतिनिधी, माजी सैनिक, नागरिक, शासकीय अधिकारी कर्मचारी, विद्यार्थी अशा सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# मुरबाडमध्ये माघी गणरायाचे भक्तिभावात आगमन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** बुद्धीची देवता, विघ्नहर्ता श्रीगणरायाचा जन्मदिवस म्हणजे माघी गणेश जयंती होय. श्रीगणेश देवता ही नवसाला पावणारी देवता असून अगदी लहानापासून थोरा मोठ्यांची गणपतीवर श्रद्धा व भक्ती पाहायला मिळते. भाद्रपद चतुर्थी नंतर माघ महिन्यात सुद्धा आता मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात गणपतीची आराधना केली जात असून घरी पुजले जातात.



मुरबाड तालुक्याच्या ग्रामीण भागात पुर्वी अगदी कमी प्रमाणात माघी गणेश पुजले जायचे परंतु आता हे प्रमाण वाढलेले दिसून येत असून अनेक गावात माघी गणेशाचे आगमन होताना दिसत आहे.

श्रीगणेशाच्या आगमनाने त्या घरातील वातावरण अगदी भक्तीमय, आंनददायी व उल्हासित असते. बाप्पा असे पर्यत घरातील सर्वचजण बाप्पा च्या सेवेत मग्न असतात. अशा या विघ्नहर्ताचे आगमन आज माघी जयंतीला म्हणजे गणेशाच्या जन्मदिनी झाले असल्यामुळे त्यातून भक्तांना नक्कीच श्रद्धेचे फळ मिळते अशी भावना प्रत्येकाच्या ठायी दिसून येत आहे.

# बदलापूर: चार वर्षीय चिमुकलीवर व्हॅन चालकाचा अत्याचार !



दै.ठाणे जीवनदीप वार्ता ✸ प्रतिनिधी / दि. २२

**बदलापूर :** बदलापुरात एका खासगी शाळेतील शिशू वर्गात शिकणाऱ्या चार वर्षीय मुलीवर गुरुवारी व्हॅन चालकाने शारीरिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. मुलगी शाळेतून घरी येताना घाबरलेली आढळली, त्यानंतर तिच्या आई-वडिलांनी तातडीने पश्चिम पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी आरोपी चालकाला ताब्यात घेतले असून, रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. घटनेची माहिती मिळताच कुळगांव-बदलापुर नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष प्रियांका दामले आणि राष्ट्रवादीच्या पदाधिकारी संगीता चेंदवणकर यांनी पोलिस ठाण्यात धाव घेत तपशील जाणून घेतला. त्यांनी दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याची मागणी केली. पोलिसांनी घटनास्थळ आणि आरोपीविरोधातील तपास सुरु केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बदलापूर पश्चिमेकडील एका खासगी इंग्रजी शाळेतील चिमुरडीसोबत ही घटना घडली आहे. 4 वर्षीय चिमुरडी आज शाळा सुटल्यानंतर खासगी मिनी बसमधून आपल्या घरी जात होती. त्यावेळी बसमध्ये कुणीही नव्हते. याच गोष्टीचा फायदा घेत नराधम बसचालकाने 4 वर्षांच्या विद्यार्थीवर अत्याचार केला. पीडित चिमुरडी जेव्हा वेळेवर घरी आली नाही, तेव्हा तिच्या पालकांनी शोधाशोध सुरू केली, तसेच शाळेत देखील फोन केला. त्यानंतर शोध सुरू असतानाच चिमुरडी घरी आली. यावेळी पालकांनी तिची विचारपूस केली असता तिने तिच्यासोबत घडलेला सगळा प्रकार सांगितले.

नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# भिवंडी महापौरपदासाठी मोर्चेबांधणी सुरू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**प्रतिनिधी/भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी सर्वसाधारण आरक्षण जाहीर झाल्याने राजकीय वातावरण तापले असून सत्तास्थापनेसाठी चुरस वाढली आहे. कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने महापालिकेत त्रिशंकू अवस्था निर्माण झाली आहे.

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचे सर्वाधिक ३० नगरसेवक निवडून आले असून भाजपाला २२ जागा मिळाल्या आहेत. भाजप–शिवसेना महायुतीकडे एकूण ३४ जागा आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) १२, समाजवादी पक्ष ६, कोणार्क विकास आघाडी ४, भिवंडी विकास आघाडी ३ तर १ अपक्ष नगरसेवक निवडून आला आहे. एकूण ९० नगरसेवकांचे



बलाबल असून सत्तास्थापनेसाठी काँग्रेस व भाजपकडून जोरदार हालचाली सुरू आहेत. महापौर पदासाठी कोणार्क विकास आघाडीची भूमिका यावेळीही निर्णायक ठरण्याची शक्यता असून माजी महापौर विलास पाटील यांच्या भोवती राजकीय घडामोडी वेग घेत आहेत. काँग्रेसकडून महापौर आमचाच होईल, असा दावा केला जात असतानाच महायुतीकडूनही वेगळी रणनीती आखली जात असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे आगामी महापौर निवडणूक व सत्तास्थापना मोठ्या राजकीय खेळीने रंगण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**पक्षीय बलाबल :**
भाजप -२२, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस-३०
शिवसेना (शिंदे )१२ राष्ट्रवादी काँग्रेस(शप )-१२
समाजवादी पक्ष-६ कोणार्क विकास आघाडी-४
भिवंडी विकास आघाडी-३
अपक्ष-१

# पडघ्यातील गणपती मंदीरात माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा :** झपाट्याने विकसीत होत असल्याने चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील प्रसिद्ध गणपती मंदीरात माघी गणेशोत्सव विविध आध्यात्मिक कार्यक्रमाव्दारे उत्साहात साजरा करण्यात आला.

दरवर्षी प्रमाणे यावर्षीही पडघा येथील बस स्थानक परिसरात असलेल्या प्रसिद्ध पुरातन गणपती मंदिरात ग्रामस्थ मंडळ पडघा व परिसराच्या वतीने गुरुवारी माघी गणेशोत्सव सोहळा घेण्यात आला. यावेळी सकाळी श्रीचां अभिषेक करण्यात आला. त्यानंतर ११ ते १२ या वेळेत हभप सुभाष महाराज तरणे, सापे यांनी सुश्राव्य प्रवचन सादर करुन उपस्थितांची मने जिंकली तर दुपारी श्री गणेश जन्म सोहळा, आरती व सामुदायिक




पडघा व परिसरातील नागरीकांनी मंदीरात दर्शनासाठी व महाप्रसाद घेण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली होती

गणेश जप, महाप्रसाद नंतर महिला भजन मंडळ पडघे यांचे भजन सायंकाळी सामुदायिक हरिपाठ, रात्री ८ वाजता महाआरती, असे दिवसभर भरगच्च आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी पडघा व परिसरातील नागरीकांनी मंदीरात दर्शनासाठी व महाप्रसाद घेण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. तर यावेळी विद्युत रोषणाईने व फुलांनी मंदीर सजविण्यात आले होते. हा उत्सव यशस्वीपणे साजरा करण्यासाठी ग्रामस्थ मंडळ पडघे यांच्या कार्यकर्त्यांनी, नागरीकांनी विशेष मेहनत घेतली.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024